# राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
## राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई अंतर्गत
## समुदाय आरोग्य अधिकारी (कंत्राटी) रिक्त पदे
## भरणेसाठीची जाहिरात

---

समुदाय आरोग्य अधिकारी (कंत्राटी) रिक्त पदांची भरती करीता प्रस्तुत जाहीरातीत नमुद केलेप्रमाणे शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

समुदाय आरोग्य अधिकारी (कंत्राटी) भरावयाचे रिक्त पदाकरीता उमेदवारांनी https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली सविस्तर जाहिरात वाचून त्याप्रमाणे विविध मुदतीत अर्ज सादर करावे. ऑनलाईन भरलेल्या अर्जा व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई अंतर्गत समुदाय आरोग्य अधिकारी या पदाची पदभरती करण्यासाठी https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण जाहिरात / अर्जाबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार उमेदवारांनी अर्ज पूर्णपणे ONLINE पद्धतीने भरावयाचे आहेत. (अर्जाकरीता लिंक नोटीफिकेशन द्वारे https://nhm.maharashtra.gov.in **वर** उपलब्ध करुन देण्यात येईल.) सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रिये संबंधित आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घ्यावयाची जबाबदारी उमेदवाराची राहील.

जे उमेदवार महाराष्ट्राचे रहिवासी आहेत, असे उमेदवार आणि महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. मकसी १००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवार पदांसाठी अर्ज करू शकतात.

१. **ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक व लिंकबाबत** - अर्जाकरीता लिंक व अर्ज सादर करण्याचा तपशिल नोटीफिकेशन द्वारे https://nhm.maharashtra.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात येईल.
परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेश पत्रामध्ये नमूद केले जाईल. परीक्षेचे प्रवेश पत्र हे परीक्षेपुर्वी ७ दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यासंबंधीची लिंक नोटीफिकेशनद्वारे द्वारे https://nhm.maharashtra.gov.in वर कळविण्यात येईल.

२. **परीक्षा शुल्क -**

२.१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रू. १०००/-

२.२. मागास प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रू. ९००/-

२.३. अनाथ उमेदवारांसाठी रू .९००/-

२.४. माजी सैनिक /दिव्यांग माजी सैनिक यांचेसाठी परीक्षा शुल्क माफ राहील.

२.५. फक्त ऑनलाईन पद्धतीनेच परीक्षा शुल्क स्विकारले जाईल.

२.६. परीक्षा शुल्क भरल्याबाबतची ऑनलाईन चलनाची (पावती) प्रत ही ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जाच्या प्रती सोबत कागदपत्रांच्या तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

## ३. अर्ज भरणे व सादर करणे बाबत आवश्यक सूचना –

३.१. उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://nhm.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी.

३.२. अर्जात हेतू पुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल (copy) करणे, वशीला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षे नंतर ही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अपात्र ठरविणे इत्यादी यापैकी प्रकरण परत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्यती कारवाई करणेचे अधिकार मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

३.३. वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (एस.एस.सी) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल.

३.४. शैक्षणिक अर्हते संदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हताधारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्याआधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल.

३.५. गुणांऐवजी श्रेणी पध्दत असल्यास कागदपत्र पडताळणी चे वेळी उमेदवारांनी गुणपत्रका सोबत श्रेणीची (Grade) यादी सादर करावी.

३.६. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्व साधारण प्रक्रिया खालील प्रमाणे आहे.

१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.
२. अर्ज सादरी करण
३. शुल्क भरणा

३.७. खालील बाबी https://nhm.maharashtra.gov.in या वेबसाईट वर नोटिफिकेशनद्वारे कळविण्यात येतील.

- अर्ज सादरीकरण प्रक्रिया
- प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करण्याची प्रक्रिया
- फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्याची प्रक्रिया
- अर्ज नोंदणी करण्याची प्रक्रिया
- परीक्षा शुल्क भरण्याची प्रक्रिया
- छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्याची प्रक्रिया
- कागदपत्रे स्कॅन व अपलोड करण्याची प्रक्रिया
- प्रवेश पत्र डाऊनलोड करण्याची प्रक्रिया

३.८. **सर्वसाधारण सूचना**

१. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने करणे.

२. अर्ज मराठी व इंग्रजी मध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

३. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतर चे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे, विवाह नोंदणी दाखला असणे आवश्यक आहे.

४. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदला संदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावी.

५. पत्र व्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयंअध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

६. अर्जामध्ये केलेला दावा व कागद पत्रे तपासणी चे वेळी सादर केलेल्या सारांश पत्रातील अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील दावायामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करून शकल्यास / न मिळाल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

७. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरातीत दिलेल्या सर्व सूचनांचे काळजी पूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

३.९. वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुसऱ्या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील

३.१०. उमेदवाराने अर्जात स्वतः चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करू इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजी पूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

३.११. उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेश पत्रावर / उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्रवरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

३.१२. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननी च्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्या शिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

३.१३. भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणा-या बदलाबाबतची सर्व माहिती https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल, याव्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाव्दारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३.१४. विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत

केला जाणार नाही.

३.१५. वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादी संदर्भात न चुकता अर्जा मध्ये स्पष्टपणे / निर्विवाद पणे दावाकरणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्ट पणे दावा केला नसल्यास, संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

३.१६. ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवा योजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/ जिल्हा सैनिक बोर्ड/ अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.

**४. परीक्षा**

४.१. जाहिरातीत नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) परीक्षेच्या किमान ७ (सात) दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येतील.

४.२. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश पत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रती सह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेश पत्रस्वतः जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.

४.३. **परीक्षा केंद्र**

१. २. ३.

उमेदवारांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्रामधून परीक्षा केंद्र निवडावे.

(*सदरची परीक्षाही ऑनलाईन पद्धतीने संगणकावर विविध सत्रात घेणेत येणार असल्याने उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्रच उमेदवाराला मिळेल याची हमी देता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.)

४.३.१. सदर परीक्षा प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर "ऑनलाईन"पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.

४.३.२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.

४.३.३. उमदेवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षाकेंद्रावर उपस्थित राहावायचे आहे यासंबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी / नुकसानीस राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई जबाबदार राहणार नाही.

४.४. ऑनलाईन परीक्षेनंतर गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणी करिता बोलावण्यात येईल.

४.५. काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये / परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती https://nhm.maharashtra.gov.in या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४.६. **ओळख पटवणे**

परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळकागद पत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळख पत्र जसे पॅनकार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधारकार्ड, बँक/ पोस्ट फोटो सहीतचे पासबुक / फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/ कॉलेजचे फोटो सहित ओळखपत्र / बारकौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेश पत्र, हजेरी पत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही , सदर उमदेवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळख पत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

**टिप** - उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यकती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेश पत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणाऱ्या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्यामहिला उमेदवारांच्या पहिल्या / मधल्या / शेवटच्या नावात विवाहानंतर फरकपडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र / विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेश पत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र या मधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळख पत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.

१. परीक्षेला उशिरा येण्याबाबत - परीक्षेच्या प्रवेश पत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेश पत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होणाच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनिटे) असली तरी उमेदवारास ओळख पटवणे. आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, सूचना देणे या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण एक तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे लागेल.

२. निवड प्रक्रियेदरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारांवर करण्यात येणारी कार्यवाही -
उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

४.७. परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रिये दरम्यान जर उमेदवाराने

१. अनुचित प्रकार करणे किंवा,

२. तोतये गिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,

३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपर मधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा

इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,

४. स्वतःच्या उमेदवारी बद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा, स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैर मार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा, दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,

५. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरे रावी करणे उद्धट पणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे.

अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.

१. राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई तर्फे घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षेसाठी/पदभरतीसाठी काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.

२. जर उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई सेवेत आधीच रुजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

## ५. पदसंख्या

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे समुदाय आरोग्य अधिकारी कंत्राटी यांच्या एकूण १९७४ पदांसाठी सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेता (जाहिरात देण्यात येत असुन त्यासाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| प्रवर्ग | Social Reservation | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | SC (१३%) | ST (७%) | VJ (A) (३%) | NT (B) (२.५%) | NT (C) (३.५%) | NT (D) (२%) | SBC (२%) | OBC (१९ %) | SEBC (१०% ) | EWS (१०%) | OPEN (२८%) | Total (१००%) |
| **पदसंख्या** | १४३* | १०३* | ३०* | ६०* | २९* | ०* | ७२* | २४३* | १९७* | १९७* | ९००* | १९७४* |
| समांतरआरक्षण | **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:-** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण (२८%) | ४८ | ३५ | ८ | २० | १० | ० | २३ | ८१ | ६४ | ६४ | २९७ | ६५० |
| महिला (३०%) | ४३ | ३१ | ९ | १८ | ९ | ० | २२ | ७३ | ५९ | ५९ | २७० | ५९३ |
| माजीसैनिक(१५%) | २१ | १५ | ५ | ९ | ४ | ० | ११ | ३६ | ३० | ३० | १३५ | २९६ |
| खेळाडू (५%) | ७ | ५ | २ | ३ | १ | ० | ४ | १२ | १० | १० | ४५ | ९९ |
| प्रकल्पग्रस्त (५%) | ७ | ५ | २ | ३ | १ | ० | ४ | १२ | १० | १० | ४५ | ९९ |
| भूकंपग्रस्त (२%) | ३ | २ | १ | १ | १ | ० | १ | ५ | ४ | ४ | १८ | ४० |
| पदवीधरअंशकालीन (१०%) | १४ | १० | ३ | ६ | ३ | ० | ७ | २४ | २० | २० | ९० | १९७ |
| दिव्यांग (४%) | एकूण ७९* पदे अस्थिव्यंग O.L.-One Leg (upto ५०% disability will be able to walk using walking aid, dominant extremity not involved. | | | | | | | | | | | |
| अनाथ (१%) | एकूण २०* पदे अनाथ | | | | | | | | | | | |

प्रवर्गनिहाय रिक्त पदसंख्या *

जाहिरातीत नमूद प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. याबाबत सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

टिप:

५.१. **दिव्यांग** - उपरोक्त तक्त्यात दिव्यांगांसाठीची ७९* पदे सा आ.वि., शा.नि. क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०३/सम-२, दि.२२.११.२०२१ मधील तरतुदीनुसार अस्थिव्यंग O.L.-One Leg (upto 50% disability will be able to walk using walking aid., Dominant extremity not involved.) या संवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत. तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात दिव्यांगाचे ते पद दर्शविण्यात येईल.)

५.२. वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय असून वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) चे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. तर शासन आदेशानुसार सदर पदे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) मधून आंतरपरिवर्तनीय नियमानुसार भरण्यात येतील)

५.३. या पदभरती प्रक्रियेस नियमाप्रमाणे सामाजिक व समांतर आरक्षण राहील. महिला, खेळाडू, दिव्यांग ,अनाथ ,माजी सैनिक,भूकंपग्रस्त ,अंशकालीन पदवीधर व प्रकल्पग्रस्त यांचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

५.४. उपरोक्त तक्त्यात अनाथासाठीची २०* पदे महिला व बालविकास विभाग , शा.नि. क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.६ एप्रिल २०२३ मधील तरतुदीनुसार या संवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत. (तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात अनाथाचे ते पद दर्शविण्यात येईल.)

५.५. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल (कमी / वाढ) होण्याची शक्यता आहे.

५.६. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची घोषणा / सूचना वेळोवेळी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या घोषणा / सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**६. पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता-**

शैक्षणिक अर्हता -

- आयुर्वेद (बीएएमएस)पदवीधारक
- युनानी (BUMS) पदवीधारक
- बीएससी नर्सिंग
- बीएससी इन कम्युनिटी हेल्थ

६.१ .आयुर्वेद (बीएएमएस) पदवीधारक व युनानी ( BUMS) पदवीधारक यांच्याकरीता जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास अंतरवासिता ( Internship) पुर्ण असणारे व NMC/MCIMनोंदणी प्रमाणपत्र असणारे उमेदवारच पात्रठरतील .सदर प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड न केल्यास अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

६.२ .बीएससी नर्सिंग/बीएससी इन कम्युनिटी हेल्थ शैक्षणिक अर्हताधारकांकरीता जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास नर्सिंग कौन्सिल च्या वैध नोंदणीद्वारे समर्थित मान्यताप्राप्त विद्यापीठातून नमूद केलेल्या पदवीचे प्रमाणपत्र असणारे उमेदवारच पात्र ठरतील .सदर प्रमाणपत्र अर्जासोबत अपलोड न केल्यास अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

६.३. उपरोक्त नमूद शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारां व्यतिरिक्त अन्य शैक्षणिक अर्हताधारकांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

## ७. प्रवेश परिक्षा –

प्रवेश परिक्षा आरोग्य विभागाने निवडलेल्या परीक्षा केंद्रांवर घेतली जाईल. प्रवेश परीक्षेची तारीख आरोग्याच्या https://nhm.maharashtra.gov.in प्रसिद्ध केली जाईल. प्रवेश परीक्षा १०० प्रश्नांची multiple objective प्रकारची असेल, प्रती प्रश्न १ गुणांचा असेल. कोणतीही निगेटिव्ह मार्किंग सिस्टीम असणार नाही. उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराला एकुण किमान ४५ गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. प्रश्नपत्रिका भारत सरकारने शिफारस केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित असेल.

**परिक्षा अभ्यासक्रम –**

| Sr. No. | Test Name | Number of Questions | Max. Marks | Version |
|---|---|---|---|---|
| 1 | 1. Basic Concepts of Public Health<br>2. Basics of Human Body<br>3. Child Health<br>4. Adolescent Health<br>5. Maternal Health<br>6. Family Planning<br>7. Communicable Diseases<br>8. Non-Communicable Diseases<br>9. Nutrition<br>10. Mental Health<br>11. Skill Based Questions<br>12. Referral Linkage<br>13. Elderly and Palliative Care<br>14. Emergency Services<br>15. Oral, ENT | 60 | 60 | Bilingual, i.e. Marathi & English |
| 2 | General Knowledge | 20 | 20 | |
| 3 | NHM-program related | 20 | 20 | |
| | **Total** | **100** | **100** | |

- प्रवेश परीक्षेचा निकाल आरोग्य विभागाच्या वेबसाइटवर प्रदर्शित केला जाईल https://nhm.maharashtra.gov.in
- परीक्षेचे स्वरूप, दर्जा व निवडीची कार्यपद्धती

७.१. ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

७.२. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात आयोजित केली जाईल. प्रत्येक प्रश्नास एकूण १ गुण याप्रमाणे १०० प्रश्नांसाठी १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्याकरीता १२० मिनीटे इतका कालावधी देण्यात येईल.

७.३. ऑनलाईन पद्धतीने घेणेत आलेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका फेर तपासणी करणेत येणार नाही, याबाबत उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे राष्ट्रीय आरोग्य अभीयान मुंबई अथवा कंपनीशी संपर्क साधू नये.

७.४. तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश होणाऱ्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरीता पाचारण करणेत येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

७.५. कागदपत्रे पडताळणीसाठी सर्व मुळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रती सह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

७.६. कागदपत्र पडताळणीनंतर निवड यादी व प्रतिक्षा यादी https://nhm.maharashtra.gov.in या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल.

७.७. कागदपत्र पडताळणीकरीता ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पारपत्र, पॅनकार्ड, वाहन परवाना (फक्त स्मार्टकार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची एक स्वसाक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

टीप - परीक्षाही Computer Based Test पद्धतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एका पेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्न पत्रिकेचे स्वरूप व त्याची काठीण्यता तपासण्यात येऊन त्याचे समानी करण करणेचे (Normalization) पद्धतीने गुणांक निश्चित करून निकाल जाहीर करणेत येईल. सदर (Normalization) सर्व परिक्षार्थी यांना बंधनकारक राहील, याची सर्व परिक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

७.८. प्रमाणपत्र प्रशिक्षण कार्यक्रम करिता प्रशिक्षण केंद्र वाटप व आयुष्मान आरोग्य मंदिर वाटप -

a. पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या आणि गुणवत्तेवर प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालये/ ट्रस्ट रुग्णालये/राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाने नियुक्त केलेल्या रुग्णालयांमध्ये ६ महिन्यांच्या प्रमाणपत्र प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रे दिली जातील. उपकेंद्रांचे वाटप प्रशिक्षणापूर्वी conditional posting द्वारे करण्यात येईल. उमेदवार जर Exit Exam मध्ये अनुतीर्ण झाल्यास conditional posting द्वारे दिलेल्या उपकेंद्रावर भविष्यात अधिकार सांगता येणार नाही.

b. सद्यस्थितीत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी /यापुर्वी समुदाय आरोग्य अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या उमेदवारांना सदर पदभरतीमध्ये भाग घेता येईल .परंतु सदर उमेदवाराची राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून कोणत्याही संस्थास्तरावरुन ) राज्यस्तर, विभागीयस्तर, जिल्हास्तर, महानगरपालिका स्तर, प्रशिक्षण संस्थास्तर (.अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करण्यात आलेली नसावी .जर उमेदवार /अर्जदार यांची सेवा राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे समाप्त केली असल्यास अशा उमेदवाराचा या पदभरती करीता विचार केला जाणार नाही . )परिपत्रक -जा .क्र.राआसो/मनुष्यबळ/कार्यमुक्त कर्मचारी/९००२३-२७०/२०२२, दि.२४/०६/२०२२ नुसार.

c. सद्यस्थितीत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी /यापुर्वी समुदाय आरोग्य अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या उमेदवारांना सदर पदभरतीमध्ये भाग घेता येईल) .वरील मुद्दा ७.८ (b ) मध्ये नमुद परिपत्रकानुसार सेवा समाप्त केलेले अधिकार व कर्मचारी वगळून (अशा उमेदवारांना ६महीने Bridge course training करण्याची आवश्यकता नसेल परंतु Entrance Exam देणे अनिवार्य असून एकत्रित Merit List अनुसार त्यांना जिल्हा /उपकेंद्र वाटप करून देण्यात येईल .परंतू अशा उमेदवारांची नियुक्ती ही नवीन नियुक्ती असेल व सद्यस्थितीत घेत असलेले वेतन लागू राहणार नाही. तसेच सदर समुदाय आरोग्य अधिकारी यांनी नवीन जागी रुजू होण्यापूर्वी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पदाचा राजीनामा राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या नियमांनुसार देणे बंधनकारक असेल.

d. ज्या उमेदवाराने यापूर्वी ६ महीने bridge course training पूर्ण केले आहे परंतु २ attempt देऊन सुद्धा अनुत्तीर्ण झाले आहेत, अशा उमेदवारांना entrance merit list अनुसार पुनःश्च ६ महीने bridge course training करिता पाठविण्यात येईल .

e. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र यांच्याकडे कोणतीही पूर्व सूचना न देता वरील सर्व निकषांमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार आहेत .

f. प्रशिक्षणा नंतर Exit Exam यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला मॉडर्न मिड लेवल सर्विस प्रमाणपत्र दिले जाईल .जे आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यक्रमांतर्गत उपकेंद्रावर समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून काम करण्यासाठी लागू होईल .सदर प्रमाणपत्र उमेदवार कोणत्याही Specialization /PrivatePractice /सरकारी नोकरीसाठी वापर करू शकत नाही.

g. प्रमाणपत्र प्रशिक्षणसाठी वाटप करण्यात आलेले प्रशिक्षण केंद्र आणि एकदा वाटप करण्यात आलेले उपकेंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

h. Bridge Course Training Exit Exam दोन प्रयत्नात उत्तीर्ण न होऊ शकलेल्या उमेदवार समुदाय आरोग्य अधिकारी या पदासाठी पात्र ठरणार नाही .

i. प्रमाणपत्र प्रशिक्षणा दरम्यान निवास आणि इतर भत्ते लागू राहणार नाही.

j. Bridge Course Training Exit Exam करिता पात्र होण्यासाठी ६महिन्यांच्या ब्रिज कोर्स प्रशिक्षणासाची ९० % उपस्थिती अनिवार्य आहे .

k. निवड झाल्यावरउमेदवाराला पुढील ३वर्ष समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून शासन सेवा देणे बंधनकारक असेल, त्याकरिता प्रशिक्षणाला रुजू होण्यापूर्वी रक्कम रु.१,०३,०००/-चा बाँड सादर करणे बंधनकारक असेल .

l. समुदाय आरोग्य अधिकारी ही पदे राज्य सरकारची नियमित पदे नसून पूर्णपणे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत.

m. समुदाय आरोग्य अधिका-यांच्या नियुक्तीसाठी समांतर व सामाजिक आरक्षण लागू असेल .त्याकरिता आवश्यक कागदपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे .

n. Exit Exam उत्तीर्ण उमेदवारांना समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून सुरुवातीला ११ महिने आणि २९ दिवसांसाठी नियुक्ती दिली जाईल, तद्नंतर केंद्र शासनाकडून प्रकल्प सुरू ठेवण्यासाठी आणि त्यांच्या कामगिरीच्या अधीन राहून वाढविली जाईल .सदर कार्यक्रम केंद्र शासनामार्फत बंद केल्यास, उमेदवार या पदावर किंवा नोकरीच्या कायमस्वरुपी हक्कावर किंवा सरकारकडून नोकरीचे संरक्षण किंवा रोजगाराच्या संरक्षणासंबंधी कोणत्याही खटल्याचा दावा दाखल करू शकत नाही.असमाधानकारक कामगिरीच्या बाबतीत, योग्य सूचना दिल्यानंतर उमेदवाराच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

**८. मोबदला -**

८ .१. महिन्यांच्या प्रमाणपत्र प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थी म्हणून निवडलेल्या उमेदवारांना रक्कम रु. १०,०००/- दरमहा स्टायपेंड दिले जाईल.

८.२. आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र येथे कंत्राटी समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर रु.२५,०००/- वेतन दर महा + रु.१५०००/- कामावर आधारित मोबदला प्रती महिना देय राहील.

८.३. राज्याने निश्चित केलेल्या अतिदुर्गम, आदिवासी भागात रक्कम रु. १५०००/- अतिरिक्त कामावर आधारित प्रोत्साहन मोबदला दिली जाईल.

## ९. परीक्षेचे वेळापत्रक

९.१. परीक्षेचे वेळापत्रक हे https://nhm.maharashtra.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल, त्याकरिता उमेदवारांनी वारंवार संकेतस्थळाला भेट देऊन खात्री करणे आवश्यक राहील.

९.२. उमेदवारांना समान गुण मिळाल्यास

उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेमध्ये समान गुण मिळाल्यास परीक्षेचा निकाल तयार करताना गुणवत्ता यादीमधील प्राधान्य क्रम पुढीलप्रमाणे राहिल.

अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहिल.

ब) समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. (अ) नुसार एका पेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त असतील तर त्यापैकी वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) वरील अ.क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य क्रम देण्यात येईल.

ड) वरील अ.क्र. (अ), (ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्रथम प्राधान्य क्रम देण्यात यावा.

**टीप** (आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३ जानेवारी २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी / मुलगे / मुलगी) होय.)

संबंधित उमेदवारांनी सदर चा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे.

## १०. उमेदवारांचे अधिवासाबाबत –

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | अधिवास (Domicile) प्रमाणपत्र आवश्यक |
| ब) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.<br>सदर उमेदवारांना सामाजिक दृष्ट्या मागास प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय ठरत नाही. |

## ११.वयोमर्यादा –

a. वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/माध्यमीक शालांत परिक्षा )एस.एस.सी (. उत्तीर्ण दाखला इ .ची स्वसाक्षांकितची छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी .

b. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांक रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहीत केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे .

c. अराखीव प्रवर्गातील उमेदवाराकरीता वयोमर्यादा कमाल ३८ वर्षे व राखीव उमेदवाराकरीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील .

d. राष्ट्रीय आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असणा-या कर्मचाऱ्यांकरीता वयोमर्यादा हि पत्र जा.क्र.राआसोमुं/मुनष्यबळ/HR Policy/६५५२३-७८४/२०२४,दि.०९/०९/२०२४ (HR Policy Chapter No. २ मधील Point no. २.४ मधील Sub point c नुसार राहील) नुसार राहील. तथापी कागदपत्रे पडताळणी दरम्यान सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे .

e. सामाजिक व समांतर आरक्षण निहाय वयोमर्यादा

| अ.क्र. | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | १८ | ३८ |
| २ | मागासवर्गीय उमेदवार | १८ | ४३ |
| ३ | दिव्यांग उमेदवार | १८ | ४५ |
| ४ | प्रकल्पग्रस्त | १८ | ४५ |
| ५ | भूकंपग्रस्त | १८ | ४५ |
| ६ | अंशकालीन | १८ | ५५ |
| ७ | माजीसैनिक | सशस्त्र दलात केलेली सेवा + ३ वर्षे | |
| ८ | माजीसैनिक (दिव्यांग) | ४५ | |
| ९ | खेळाडू | १८ | ४३ |
| १० | अनाथ | १८ | ४३ |
| ११ | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य | १८ | ४५ |

f. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांक -०४ /१२/२०२५ रोजीचे उमेदवाराचे वय ग्राह्य धरणेत येईल.

१२. **सामाजिक व समांतर आरक्षण-**

१२.१. **खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक -**

१२.१.१. सदरचे आरक्षण हे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी लागू करण्यात आलेले आहे.

१२.१.२. खुल्या प्रवर्गा व्यतिरिक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय नाही.

१२.१.३. या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या / उमेदवाराच्या कुटूंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू.८.०० लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटूंबीय महाराष्ट्र राज्यात दि.१३ ऑक्टोबर १९६७ रोजी किंवा त्यापुर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.

१२.१.४. उमेदवाराकडे सक्षम प्राधिकारी यांनी विहित नमुन्यातील निर्गमित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१२.२. **महिला आरक्षण –**

१२.२.१. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दि. ०४ मे २०२३ अन्वये खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिलांनी तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने सदर शासन निर्णयान्वये रद्द करणेत आलेली आहे.

१२.२.२. मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, विमुक्तजाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) आणि विशेष मागास प्रवर्गया प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२.२.३. महिला उमेदवारांनी सादर केलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र आयुक्त, महिला व बालविकास विभागाकडून तपासणी करून घेणेत येईल.

१२.२.४. महिलांकरिता आरक्षित पदावर पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या प्रवर्गातील पात्र पुरूष उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

१२.३. **खेळाडू –**

१२.३.१. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे शासन निर्णय दि.०१ जुलै,२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १० ऑक्टोबर २०१७, शासन निर्णय दि. ३० जून २०२२ आणि तद्‌नंतर शासनाने यासदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडूंबाबत आरक्षण, क्रिडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

१२.३.२. उमेदवाराने सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा संबंधित प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी करीता केलेल्या अर्जाची पोच पावती सादर न केल्यास त्याच टप्प्यावर खेळाडू आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल.

१२.३.३. खेळाडू आरक्षणासाठी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

१२.३.४. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१२.४. **माजी सैनिक –**

१२.४.१. शासन परिपत्रक साप्रविक्र. आरटीए१०७९/४८२/१६-अ दिनांक १६/०४/१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे.

१२.४.२. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्याबाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्याबाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

१२.४.३. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून

पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.

१२.४.४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए ९०९०/६२/प्र.क्र. २२२/९१/२८ मुंबई दि.३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.

१२.४.५. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दि.२ सप्टेंबर १९८३ अन्वये

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात आणि युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यासा पात्र राहील.

ब) युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५ टक्के आरक्षित पदापैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१२.५. **प्रकल्प ग्रस्त –**

१२.५.१. शासन निर्णय साप्रविक्र. एईएम१०८०/३५/१६अ दिनांक २० जानेवारी १९८० व शासन निर्णय साप्रविक्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे.

१२.५.२. प्रकल्पग्रस्त यासमांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१२.५.३. उमेदवाराने सदर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२.६. **भूकंपग्रस्त –**

१२.६.१. शासन निर्णय साप्रविक्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ नुसार भुकंप ग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे.

१२.६.२. उमेदवाराकडे जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ नुसार दिलेले प्रमाणपत्र असणे बंधनकारक राहिल.

१२.६.३. उमेदवाराने सदर भूकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे

१२.७. **पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवार –**

१२.७.१. शासन निर्णय दि. २७ ऑक्टोंबर २००९ अन्वये पदवीधर / पदविका धारक अंशकालीन यासमांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार यायोजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१२.७.२. रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणी चे वेळी सादर करणे

आवश्यक आहे.

१२.८. **अनाथ -**

१२.८.१. अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक - अनाथ-२०१८/प्र.क्र.१२२/का-३, दि. ६ एप्रिल २०२३ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहिल.

१२.८.२. अनाथांसाठी “संस्थात्मक” व “संस्थाबाह्य” अशा दोन प्रकारामध्ये आरक्षण देय राहील.

१२.८.३. **संस्थात्मक आरक्षण**

१. संस्थात्मक आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले आहे व ज्यांचे शासनमान्यता प्राप्त संस्थांमध्ये पालन पोषण झाले आहे अशा बालकांचा समावेश असेल. (तसेच महिला व बाल विकास विभागांतर्गत बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अन्वये कार्यरत बालकांच्या काळजी व संरक्षणाची संबंधित संस्थांमध्ये तसेच महिला व बाल विकास विभागा व्यतिरिक्त अन्य विभागांकडून मान्यता प्रदान करणेत आलेल्या अनाथालये अथवा तत्सदृश संस्थांमध्ये पालन झालेल्या अनाथांचा यामध्ये समावेश असेल.)

१२.८.४. **संस्थाबाह्य आरक्षण**

१. संस्थाबाह्य आरक्षणामधून लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले आहे आणि ज्यांचे शासन मान्यता प्राप्त संस्थे बाहेर / नातेवाईकाकडे संगोपन झालेले आहे अशा बालकांचा समावेश असेल.

१२.८.५. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवाराकडे महिला व बाल विकास विभागाकडून निर्गमित करणेत आलेले अनाथ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१२.८.६. अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात येईल.

१२.८.७. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गात करण्यात येईल.

१२.९ **दिव्यांग** -

उपरोक्त तक्त्यात दिव्यांगांसाठीची ७९* पदे सा आ.वि., शा.नि. क्र. संकीर्ण- २०२०/प्र.क्र.१०३/सम-२, दि.२२.११.२०२१ मधील तरतुदीनुसार अस्थिव्यंग O.L.-One Leg (upto 50% disability will be able to walk using walking aid., Dominant extremity not involved.) या संवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत. तसेच * उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात दिव्यांगाचे ते पद दर्शविण्यात येईल.)

**१३. सर्वसाधारण सूचना -**

१३.१. ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाज कल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्प ग्रस्त, भूकंप ग्रस्त, अंशकालीन, खेळाडू अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर

ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत व त्यांना याबाबत कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

१३.२. अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

१३.३. वि.जा.(अ)/ भ.ज.(ब)/ भ.ज.(क)/ भ.ज.(ड)/ वि.मा.प्र., इमाव, ईडब्ल्युएस या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अलिकडील / नविनतम मूळ नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची पडताळणी कागदपत्र तपासणीच्या वेळी करण्यात येईल.

१३.४. शासन परिपत्रक, सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१२/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दि.२५ मार्च २०१३ अन्वये विहित कार्यपद्धती नुसार तसेच शासनशुद्धीपत्रक संबंधित जाहिरातीमध्ये नमूद अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांक संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटामध्ये मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी गृहित धरण्यात येईल.

१३.५. शासन परिपत्रक, सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१, दि. १७ ऑगस्ट २०१३ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटयामध्ये मोडत नसल्याचे नॉन - क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

१३.६. अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषा संदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशींकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१३.७. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परीक्षेस बसण्याचा/ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हताधारण करीत नसल्याचे आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवडप्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१३.८. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्याप्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य तीकार्यवाही करण्यात येईल.

१३.९. चारित्र्य -पुर्व चारित्र्य पडताळणी अंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/ सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील.

१३.१०. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (मागासवर्गीयांसाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधील कलम ४(३) नुसार विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) याप्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परीवर्तनीय असेल .आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रचलीत/ सुधारीत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

१३.११. ऑनलाईन परिक्षा व कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१३.१२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्विकारले जाणार असल्याने स्पर्धा परीक्षेअंती गुणवत्तेनुसार प्रथम अंतरीम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. तद्नंतर अर्ज सादर करताना उमेदवारांनी अर्जात नमूद केलेले व सदर पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव तसेच सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक असणारी सर्व विहित मूळ कागदपत्रे यांची छाननी करून अंतिम निवड यादी व प्रतिक्षायादी प्रसिद्ध करण्यात येईल. जे उमेदवार कागद पत्र छाननीच्या वेळी मूळ कागदपत्र दर्शविण्यास असमर्थ ठरतील, असे उमेदवार अंतिम निवडीस पात्र राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

१३.१३. माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षित असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णययानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३.१४. खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/ भुकंपग्रस्त / पदवीधर-पदविकाधारक अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार करणेत येईल.

१३.१५. वरील अटी व शर्ती नियमा व्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

१३.१६. जाहिराती मधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

१३.१७. सदर पदभरती नियम / निकषामध्ये पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय / शासन शुद्धीपत्रक / शासन अधिसूचना यानुसार बदल होऊ शकतो. जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्येत कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदार / उमेदवाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे / रद्द करणे / अंशत: बदल करणेइ. बाबतचे सर्व अधिकार हे राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई स्वत:कडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**१४. इतर सर्वसाधारण अटी / शर्ती / सूचना -**

१४.१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबत चे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोक प्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तसाच अर्थ असेल.

१४.२. जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,

भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणी चे वि नियम) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४.३. उमेदवारांना परीक्षेची प्रवेश पत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठक व्यवस्था व इतर संबंधी सूचना वेळोवेळी https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येतील. याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेत स्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत यास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

१४.४. कागदपत्र पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादी व त्यासंबंधीच्या इतर सूचना https://nhm.maharashtra.gov.in या राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येतील.

१४.५. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजणेत येईल. अर्जातील माहिती बदला बाबत कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

१४.६. भरतीबाबतचे सर्व अधिकार राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे राहतील.

**१५.निवडसुची कालमर्यादा -**

राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई अंतर्गत निवड समितीने तयार केलेली निवड सूची एक वर्षासाठी विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवड सूची व्यपगत होईल.

१६.**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र -**

a. शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील .
b. तसेच अर्जासोबत सदर लहान कुटुंब छायांकित प्रमाणपत्र सादर करावे व उमेदवाराने आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान लहान कुटुंब असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे .
c. सदर लहान कुटुंबाचे प्रमाणपत्राचा नमुना अर्जा सोबत जोडला आहे .

**१७. शुल्क -**

a. उमेदवारांनी अर्ज सादर करताना खालीलप्रमाणे शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे .एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही.
b. अर्ज करण्याकरिता खुल्या प्रवर्गासाठी रु.१००० -/व मागास प्रवर्गासाठी रु.९००/- राहील .
c. उपरोक्त शुल्का व्यतिरिक्त बॅक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील

स्थळ: मुंबई
दिनांक:- ०४/१२/२०२५

**स्वाक्षरीत/-**
**( राजेंद्र बी. भालेराव )**
**सहसंचालक (अतांत्रिक)**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,**
**३ रा मजला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,**
**पी. डिमेलो रोड, सीएसएमटी ,**
**मुंबई-४००००१**

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन**

**<u>नमुना - अ</u>**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंब प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील**

**प्रतिज्ञा पनाचा नमुना - अ**

**(नियम ४ पहा)**

मीश्री/श्रीमती/कुमारी---------------------------- श्री--------------------------------------------
यांचा /यांचीमुलगा/मुलगी/पत्नी वय--- -----वर्ष राहणार---------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करते / करतो की,

१) मी --------------- पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर आलेल्या मुलांची संख्या ----------आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यात पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण-

दिनांक - / /२०२५

अर्जदाराची सही

अर्जदाराचे संपुर्ण नाव